महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळ,
तथा सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
नविन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, ५, बी.जे.रोड, पुणे-४११००१.
दूरध्वनी क्र.: २६१२२८४६/४७ Email – commpat2018@gmail.com

जा.क्र.सआ-५/पतसंस्था/नि.मं.सुचना/एन.पी.ए/ ४४४ /२०२४, दिनांक : ५ फेब्रुवारी, २०२४

राज्यातील बिगर कृषी सहकारी पतसंस्थाना मान्य उत्पन्न संकल्पना, जिंदगीचे वर्गीकरण व तरतूदी (एनपीए) (Income recognition, Assets classification and provisions - (NPA) Non Performing Assets) लागु करणेबाबत सुधारित मार्गदर्शक सुचना....

परिपत्रक

वाचावे :-

१) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयीन परिपत्रक क्र. ना.बँका/डी-४/पतसंस्था/एन.पी.ए./ ८०२ /२००४,दि.१०/११/२००४

२) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयीन परिपत्रक दि.२१/१२/२००४, दि.०९/०५/२००५, दि.२०/०२/२००७, दि.२१/०७/२००८, दि.०५/०२/२०११, दि.२३/०१/२०१७, दि.२५/११/२०१९.

३) महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळ, पुणे यांची सभा दि.१०/०३/२०२२ मधील निर्णय.

४) महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळ, पुणे यांचे परिपत्रक दि.२७/०३/२०२०, दि.२७/०३/२०२०, दि.०१/१०/२०२०, दि.१७/०३/२०२२, दि.३१/०३/२०२२.

प्रस्तावना :

भारत सरकारने १९९१ पासून आर्थिक उदारीकरणाची निती अवलंबल्यानंतर देशाच्या औद्योगिक व व्यापार धोरणात मोठ्या प्रमाणावर बदल झालेला आहे. या क्षेत्रातील उलाढाल वाढीचे दृष्टीने मदत व्हावी म्हणून आर्थिक क्षेत्रात (Financial Sector) सुधारणा होणेसाठी शासनाने नरसिंहम समिती नेमली होती. समितीने भारतीय बँकींग पध्दती व लेखांकन मानके (Accounting Standards) संबंधी सहकारी बँकांचे लेखापध्दतीत आवश्यक त्या सुधारणा सुचवल्या होत्या. या सुचनांच्या अनुषंगाने रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने भारतातील सर्व बँकांसाठी अनेक विवेकी मापदंड (Prudential Norms) बाबत वेळोवेळी मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

सहकार चळवळीमध्ये महाराष्ट्र राज्य देशात अग्रेसर राज्य असून, नागरी सहकारी बँकांप्रमाणेच राज्यातील मोठया प्रमाणावर असणाऱ्या नागरी सहकारी पतसंस्था व बिगरशेती सहकारी पतसंस्था तसेच पगारदार पतसंस्था ह्या आर्थिकदृष्ट्या सुदृढ व्हाव्यात व या संस्थामधील ठेवीदारांचे हित जोपासण्यासाठी

नागरी सहकारी बँका/ राष्ट्रीयकृत बँका/ खाजगी बँकांमध्ये अस्तित्वात असलेली लेखा पध्दती व विवेकी मापदंड (Prudential Norms) राज्यातील नागरी सहकारी पतसंस्था व बिगरशेती सहकारी पतसंस्था तसेच पगारदार पतसंस्था यांना सन २००५-२००६ पासून लागू करण्यात आलेले आहेत.

नागरी सहकारी पतसंस्था व बिगरशेती सहकारी पतसंस्था तसेच पगारदार पतसंस्था या आर्थिक क्षेत्रात महत्वाची भूमिका पार पाडत असल्याने त्यांच्या लेखापध्दतीत एकसूत्रीपणा व पारदर्शकता आणून सभासद व ठेवीदारांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी तसेच या संस्था आर्थिकदृष्टया सक्षम होण्यासाठी यापूर्वीपासून पतसंस्थांना लागू असणाऱ्या निकषांबाबतीत अधिक स्पष्टता व कालानुरूप त्यात बदल करणे अत्यंत आवश्यक झाले आहे. राज्यातील पतसंस्थांवरील जनतेचा विश्वास वाढण्याच्या दृष्टीने तसेच सहकार चळवळीस पोषक वातावरण निर्माण होण्यास्तव परिस्थितीनुरुप पतसंस्थांच्या लेखा पध्दतीत काही बदल करणे आवश्यक आहे.

संस्थांचा ताळेबंद आणि नफातोटा पत्रक (हिशेब पत्रके) संबंधीत संस्थांची योग्य व रास्त आर्थिक स्थिती दर्शविण्यासाठी सहकारी पतसंस्थांनी उत्पन्नक्षमता नसलेल्या जिंदगी/ मालमता अथवा कर्ज खात्यावर आकारण्यात आलेले कोणतेही व्याज अथवा इतर उत्पन्न हे प्रत्यक्ष वसूल झाल्याखेरीज नफा तोटा खाती उत्पन्न म्हणून घेऊ नये, हे या संकल्पनेमध्ये मुख्य तत्व आहे.

मागील काही वर्षांचा अनुभव लक्षात घेता अनेक पतसंस्थानी निर्धारीत व त्यांना लागु असलेले विवेकी मापदंड (Prudential Norms) विवेकपूर्ण पद्धतीने अंमलात न आणल्यामुळे, संबंधीत संस्थांना योग्य पद्धतीने आपले वित्तीय व्यवहारातील जोखीम व्यवस्थापन करता आलेले नाही. त्यामुळे याचा अंतिम परिणाम म्हणून राज्यातील काही पतसंस्था आर्थिकदृष्ट्या अडचणीत आल्याने संबंधीत संस्थांच्या सभासद व ठेवीदारांच्या हितास बाधा पोहोचल्याचे दिसुन येत आहे.

वरील वाचावे क्र.१ अन्वये राज्यातील नागरी सहकारी पतसंस्था व बिगरशेती सहकारी पतसंस्था तसेच पगारदार सहकारी पतसंस्थांना सन २००५-२००६ पासूनच **मान्य उत्पन्न संकल्पना, जिंदगीचे वर्गीकरण व तरतूदी (एन.पी.ए.)** लागू करणेबाबत सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. राज्यातील काही सहकारी पतसंस्थांनी सदर निर्गमित परिपत्रकीय सुचनांच्या अनुषंगाने काही अडचणी व शंका उपस्थित केलेल्या आहेत. या बाबींचा विचार करता तसेच मागील सुचनांमधील संदिग्धता दुर करणेचे दृष्टीने सहकारी पतसंस्था व सहकारी बँकांचे नियमन व्यवस्थेबाबत कामकाजाच्या दृष्टीने तफावत पाहता, राज्यातील नागरी व ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था तसेच पगारदार सहकारी पतसंस्थांना लागु करावयाच्या मान्य उत्पन्न संकल्पना, जिंदगीचे वर्गीकरण व तरतूदी (एन.पी.ए.) बाबतीत स्पष्टीकरणासह सुधारित सर्वसमावेशक परिपत्रकीय सुचना निर्गमित करणे आवश्यक झाले आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता, वाचावे क्र.१ अन्वये निर्गमित दि.१०/११/२००४ च्या परिपत्रकीय सुचना तसेच सदर बाबत या कार्यालयाद्वारे वेळोवेळी निर्गमीत संबंधित सुचना अधिक्रमित करण्यात येत आहेत. यापुर्वी निर्गमीत सर्व परिपत्रके व सुचना रद्द करण्यात आलेल्या असल्या तरीही, यापुर्वी निर्गमित परिपत्रक/ सुचनांन्वये कोणत्याही प्रकारची कारवाई सुरू असेल किंवा प्रलंबित असेल, अशा प्रकरणी पूर्वीच्या परिपत्रकातील तरतुदी व सुचनांनुसार त्या बाबतीत अंतिम कारवाई सुरू राहील.

राज्यातील सर्व नागरी सहकारी पतसंस्था व बिगरशेती सहकारी पतसंस्था तसेच पगारदार पतसंस्था यांना मान्य उत्पन्न संकल्पना, जिंदगीचे वर्गीकरण व तरतूदी (एन.पी.ए.) (Income

recognition, Assets classification and provisions - (NPA) Non Performing Assets) बाबत खालीलप्रमाणे सर्वसमावेशक सुधारित परिपत्रकीय सुचना वजा निर्देश देण्यात येत आहेत.

विविध व्याख्या -

१) थकबाकी दिनांक -

जेव्हा एखाद्या जिंदगी / मालमत्तेवरील उत्पन्न अथवा मुदत कर्जखात्यावरील देय व्याज अथवा मुद्दल परतफेड हप्ता किंवा दोन्हीही यापैकी कोणतीही रक्कम नियत तारखेला प्राप्त होत नाही, त्यावेळी सदर रक्कम थकबाकी मानली जाते.

वरील थकबाकीच्या व्याख्येनुसार कर्जावरील देय व्याज अथवा मुद्दल या दोन्ही पैकी जी सर्वात अगोदरची थकबाकी तारीख असेल ती थकबाकी दिनांक होय.

२) खेळते भांडवलासाठी कॅशक्रेडीट किंवा ओव्हरड्राफ्ट अनियमित (आऊट ऑफ ऑर्डर) दिनांक-

मुदत कर्जाव्यतिरिक्त पतसंस्था खेळते भांडवलासाठी कॅश क्रेडीट किंवा ओव्हरड्राफ्ट सारखी कर्जे देतात. या कर्जामध्ये जास्तीत जास्त १२ महिने मुदतीसाठी विशिष्ट कर्ज मर्यादा मंजूर केली जाते व या मर्यादेचे अधीन राहून या खात्यावर वारंवार उलाढाल (जमा आणि नावे व्यवहार) करण्याची मुभा दिलेली असते. या कर्ज प्रकारात मुदत कर्जासारखी नियत दिनांकाला मुद्दल अथवा व्याज परतफेड अपेक्षित नसल्याने खालील चार अनियमित कारणांपैकी कोणत्याही एका कारणाने अशी कर्जे अनियमित दिनांक - (आऊट ऑफ ऑर्डर) होऊ शकतात.

१) देय दिनांकापासून एन.पी.ए. साठी निर्धारित केलेल्या कालावधीपेक्षा अधिक कालावधीचे व्याज थकीत असल्यास........... **किंवा**

२) मुदत संपलेल्या दिनांकापासून रीतसर नूतनीकरण न केल्यास (पतसंस्थांना कोणत्याही कर्जाला केवळ मुदतवाढ करण्यास प्रतिबंध आहे) .... **किंवा**

३) दरमहाची तारण उचल पात्र मर्यादा किंवा मंजूर मर्यादेपैकी किमान रकमेच्या तुलनेत खात्यावरील व्याज व खर्चासह येणे बाकी सातत्याने अधिक असेल तर... **किंवा**

४) एका आर्थिक वर्षात सदर कर्ज खात्यामध्ये मंजूर मर्यादेच्या किमान चार पट व्यावसायिक उलाढाल (दुबेरजी नोंदी सोडून, केवळ व्यावसायिक जमा रक्कम) न झाल्यास ....

३) मुदत कर्जासाठी अनुत्पादक जिंदगी (एन.पी.ए.) दिनांक -

एखाद्या जिंदगी / मालमत्तेवरील उत्पन्न अथवा मुदत कर्जखात्यावरील थकीत व्याज अथवा मुद्दल परतफेड हप्ता किंवा दोन्हीही यापैकी कोणतीही थकबाकी रक्कम निर्धारित केलेल्या मुदतीनंतर देखील वसूल होत नाही. अशावेळी एन.पी.ए. गणना करणेचे दिवशी त्या त्या आर्थिक वर्ष किंवा कालावधीसाठी अनुत्पादक जिंदगी (एन.पी.ए.) निश्चितीसाठी जो निर्धारीत कालावधी (सवलतीचा कालावधी) दिला आहे, तो कालावधी ज्या दिवशी संपेल तो अनुत्पादक जिंदगी (एन.पी.ए.) दिनांक होय.

४) अनुत्पादक जिंदगी ठरविणेसाठी (एन.पी.ए.) निर्धारण कालावधी -

सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षापासून अनुत्पादक जिंदगी (एन.पी.ए.) निश्चितीसाठी १८० दिवस एवढा कालावधी राहील. अपवादात्मक परिस्थितीत हा कालावधी कमी किंवा जास्त केल्यास तो तेवढयाच कालावधी / वर्षाकरिताच लागू राहील.

५) उत्पादित जिंदगी / मालमता अर्थात परफॉर्मिन असेट्स (पीए)-

एखादया जिंदगी / मालमत्तेवरील अथवा मुदत कर्जखात्यावरील देय व्याज अथवा मुद्दल परतफेड हप्ता किंवा दोन्हीही यापैकी कोणत्याही कारणाने तसेच खेळते भांडवलासाठी दिलेल्या कॅशक्रेडीट किंवा ओव्हरड्राफ्ट कर्जाचे बाबतीत दिलेल्या चार अनियमित (आऊट ऑफ ऑर्डर) कारणांपैकी कोणत्याही एका कारणाने अनुत्पादक जिंदगी (एन.पी.ए.) झाली नसल्यास किंवा एखादया जिंदगी / मालमत्तेवरील अथवा मुदत कर्जखात्यावरील देय व्याज अथवा मुद्दल परतफेड हप्ता तसेच कॅश क्रेडीट किंवा ओव्हरड्राफ्ट कर्जाचे बाबतीत दिलेल्या चार अनियमित (आऊट ऑफ ऑर्डर) कारणांपैकी कोणत्याही एका कारणाने अनियमित झालेला कालावधी हा निर्धारित कालावधीच्या मर्यादेत असेल तर ती जिंदगी / मालमता (कर्ज खाते) उत्पादित अर्थात परफॉर्मिंग असेट्स (पीए) होय.

६) अनुत्पादक जिंदगी/मालमत्ता (एन.पी.ए.) म्हणजे काय ?

एखादया जिंदगी / मालमत्तेवरील अथवा मुदत कर्जखात्यावरील देय व्याज अथवा मुद्दल परतफेड हप्ता किंवा दोन्हीही, यापैकी कोणतीही थकीत रक्कम निर्धारित कालावधीपेक्षा अधिक कालावधीसाठी थकीत असल्यास व प्रत्यक्षात वसुल न झाल्यास, तसेच खेळते भांडवलासाठी दिलेल्या कॅशक्रेडीट किंवा ओव्हरड्राफ्ट कर्जाचे बाबतीत दिलेल्या चार अनियमित (आऊट ऑफ ऑर्डर) कारणांपैकी कोणत्याही एका कारणाने अनियमित दिनांकापासून निर्धारित कालावधीपेक्षा अधिक कालावधी झाला असल्यास, ती जिंदगी / मालमत्ता अथवा कर्ज खाते अनुत्पादक जिंदगी / मालमत्ता (एन.पी.ए.) होय.

७) ढोबळ एन.पी.ए. रक्कम-

अनुत्पादक जिंदगी (एन.पी.ए.) म्हणून वर्गीकृत झालेल्या सर्व कर्जाच्या पुस्तकी येणे बाकीची (लेजर बॅलन्स) एकूण बेरीज होय.

८) एकूण कर्ज व अग्रिम-

एन.पी.ए. गणना करणेचे दिवशी संस्थेचे ताळेबंदामध्ये दर्शविलेली एकूण सर्व प्रकारच्या कर्ज बाकीची रक्कम होय.

९) ढोबळ एन.पी.ए. प्रमाण -

ढोबळ एन.पी.ए. रकमेचे एकूण येणे कर्जबाकी रकमेशी शेकडा प्रमाण होय.

१०) निव्वळ कर्ज रक्कम-

एन.पी.ए. गणना करणेचे दिवशी संस्थेचे ताळेबंदामध्ये दर्शविलेल्या एकूण येणे कर्ज बाकी रकमेतून संस्थेचे ताळेबंदामध्ये दर्शविलेली एकूण एन.पी.ए. तरतूद वजा केल्यानंतर शिल्लक असलेली रक्कम होय.

११) निव्वळ एन.पी.ए. रक्कम-

ढोबळ एन.पी.ए. रकमेतून एन.पी.ए. गणना करणेचे दिवशी संस्थेचे ताळेबंदामध्ये दर्शविलेली एकूण एन पी ए तरतूद वजा केल्यानंतर शिल्लक असलेली रक्कम होय.

१२) निव्वळ एन.पी.ए प्रमाण-

निव्वळ एन.पी.ए. रकमेचे निव्वळ कर्ज रकमेशी शेकडा प्रमाण होय.

१३) अनुत्पादीत जिंदगी / मालमत्तेचे वर्गीकरण - (NPA Asset Classification)

नागरी सहकारी पतसंस्थांना सन २००५-२००६ या आर्थिक वर्षापासून अनुत्पादक जिंदगी/ मालमत्ता (एन.पी.ए.) ही संकल्पना लागू केली आहे. नागरी सहकारी पतसंस्थांबाबत कोणतीही उत्पन्न न देणारी जिंदगी / मालमत्ता वरील नमूद अनुत्पादक जिंदगी / मालमत्ता (एन.पी.ए.) दिनांक दिवसापासून उत्पन्नक्षमता नसलेले खाते समजण्यात येणार आहे. ज्या दिवशी हि जिंदगी / मालमत्ता अनुत्पादक होईल त्या दिवसापासून या अनुत्पादक जिंदगी / मालमत्ता अथवा कर्ज खात्यावर प्रत्यक्षात वसूल होणारे व्याजच उत्पन्नात घ्यावयाचे असून, जे व्याज प्रत्यक्षात वसूल झालेले नाही असे व्याज जर उत्पन्नात घेतले असेल तर ते व्याज उत्पन्नामधून वजा करावयाचे आहे.

अनुत्पादक जिंदगी अथवा कर्ज खात्यावर कोणत्याही प्रकारे प्रत्यक्षात वसूल न होणारे व्याज सदर खाती नावे टाकून किंवा येणे व्याज दर्शवून उत्पन्नात घ्यावयाचे नसून, केवळ प्रत्यक्षात वसूल होणारे व्याजच सदर जिंदगी अथवा कर्ज किंवा येणे व्याज खाती नावे टाकून उत्पन्नात घ्यावयाचे आहे.

व्याज रकमेप्रमाणेच अन्य खर्च देखील उदा. विमा खर्च, वसुली खर्च, टपाल खर्च इ. प्रत्यक्षात वसूल न झाल्यास खात्यावर नावे टाकू नये आणि नावे टाकून किंवा येणे खर्च दर्शवून उत्पन्नात घेतले असेल तर ते उत्पन्नामधून वजा करावयाचे आहे.

अनुत्पादीत जिंदगी / मालमत्ता अथवा कर्ज खात्यावर वसूल न होणारे व्याज कर्ज करारानुसार स्वतंत्रपणे बाजूला काढून ठेवायचे असुन, विमा खर्च, वसुली खर्च, टपाल खर्च इत्यादी खर्च रक्कमा संस्थांनी स्वतःचे नफा तोटा खाती नावे टाकून जमाखर्च करावयाचा आहे. सदरच्या स्वतंत्र दुबेरजी नोंदी करुन, प्रत्यक्ष वसुलीचे वेळी हि रक्कम वसूल करावी .

उत्पादित तसेच अनुत्पादीत कर्ज अथवा जिंदगी / मालमत्तावरील व्याज आकारणी व खर्च रकमेबाबतीत हिशोब नोंदीचा तपशील या परिपत्रकात स्वतंत्रपणे दिला आहे. जिंदगी / मालमत्ता अथवा कर्जखाते एनपीए ठरविताना कर्जदार अथवा जामीनदार यांनी दिलेल्या तारणाची किंमत अथवा प्रभावशाली कर्जदारांच्या संबंधित बाबी विचारात न घेता केवळ रक्कम वसुलीचा इतिहास (रेकॉर्ड ऑफ रिकव्हरी) विचारात घेऊनच अनुत्पादीत कर्ज अथवा जिंदगी / मालमत्तेचे एन.पी.ए वर्गीकरण करणे आवश्यक आहे. तारणाच्या किंमतीचा विचार केवळ एन.पी.ए. संशयित कर्ज खाते संबंधित वर्गवारीची तरतूद (Provision) करताना केला जाईल.

नागरी सहकारी पतसंस्थांनी एन.पी.ए. खात्यात कर्जाचा हप्ता / व्याज रक्कम प्रत्यक्षात वसुल झाली नसल्यास, अनुत्पादीत जिंदगी / मालमत्तेचे (एन.पी.ए.) वर्गीकरण खाली नमूद कालावधीनुसार करावे.

१४) उत्तम जिंदगी - (Standard Asset)

मुदत कर्जाचे बाबतीत मुद्दल किंवा व्याज अथवा दोन्ही रक्कम थकबाकी पैकी कोणतीही एक थकबाकी किंवा खेळते भांडवल बाबतीत दिलेल्या चार अनियमित (आऊट ऑफ ऑर्डर) कारणांपैकी कोणत्याही एका कारणाने अनियमित झाले असले तरी त्याचा कालावधी निर्धारित १८० दिवस किंवा त्यापेक्षा कमी कालावधीचा असल्यास सदर खाते उत्तम जिंदगी समजणेत येईल. यावर किमान ०.२५% तरतूद करण्यात यावी. सदर तरतूद हि निव्वळ नफा काढणेपूर्वी वेळप्रसंगी तोटा सहन करुन करावी.

वरील तरतूद रक्कम नियम ३५ नुसार स्वनिधी निर्धारित करताना विचारात घेता येणार नाही, तथापि अन्य उद्देशासाठी असलेल्या स्वनिधी मध्ये समाविष्ट करता येईल.

१५) अनुत्पादीत जिंदगी/ मालमत्ता -(एन.पी.ए.)

अ) दुय्यम कर्ज खाते - (Sub Standard Asset)

जे कर्जखाते अनुत्पादीत (एन.पी.ए.) दिनांकापासून सतत १२ महिने अनुत्पादीत (एन.पी.ए.) असल्यास किंवा थकीत/अनियमित (आउट ऑफ ऑर्डर) दिनांकापासून १८ महिने थकीत किंवा अनियमित असल्यास अशा खात्यास दुय्यम खाते समजावे. अशा रक्कमेवर खाली दिलेल्या वर्षनिहाय परिशिष्टानुसार प्रतिवर्षी तरतूद करावी.

ब) संशयित कर्ज खाते - (Doubtful Asset)

१) संशयित कर्ज खाते (१)- Doubtful Asset (1)

जे कर्जखाते अनुत्पादीत (एनपीए) दिनांकापासून १२ महिन्यापेक्षा जास्त परंतु ३६ महिन्यापेक्षा कमी कालावधीकरिता अनुत्पादीत (एनपीए) असल्यास किंवा थकीत अथवा अनियमित (आउट ऑफ ऑर्डर) दिनांकापासून १८ महिने पेक्षा जास्त परंतु ४२ महिन्यापर्यंत थकीत अथवा अनियमित (आऊट ऑफ ऑर्डर) असल्यास अशा खात्यास संशयित कर्ज खाते(१) समजावे. अशा रक्कमेवर खाली दिलेल्या वर्षनिहाय परिशिष्टानुसार प्रतिवर्षी तरतूद करावी.

२) संशयित कर्ज खाते(२) - (Doubtful Asset) (२)

जे कर्जखाते अनुत्पादीत (एनपीए) दिनांकापासून सतत ३६ महिनेपेक्षा जास्त परंतु ४८ महिन्यापेक्षा कमी कालावधी करिता अनुत्पादीत (एनपीए) असल्यास किंवा थकीत अथवा अनियमित (आउट ऑफ ऑर्डर) दिनांकापासून ४२ महिने पेक्षा जास्त परंतु ५४ महिन्यापर्यंतच्या काळापर्यंत थकीत अथवा अनियमित (आऊट ऑफ ऑर्डर) असल्यास अशा खात्यास संशयित कर्ज खाते (२) समजावे. अशा रक्कमेवर खाली दिलेल्या वर्ष निहाय परिशिष्टानुसार प्रतिवर्षी तरतूद करावी.

३) संशयित कर्ज खाते (३) - (Doubtful Asset) (३)

जे कर्जखाते अनुत्पादीत (एनपीए) दिनांकापासून सतत ४८ महिन्यापेक्षा जादा कालावधीकरिता एन.पी.ए. असल्यास किंवा थकीत अथवा अनियमित (आऊट ऑफ ऑर्डर)

दिनांकापासून ५४ महिने पेक्षा जास्त काळापर्यंत थकीत अथवा अनियमित (आऊट ऑफ ऑर्डर) असल्यास अशा खात्यास संशयित कर्ज खाते (३) समजावे. अशा रक्कमेवर खाली दिलेल्या वर्षनिहाय परिशिष्टानुसार प्रतिवर्षी तरतूद करावी.

क) बुडित कर्ज खाते - (Loss Asset)

जे कर्जखाते वसुल होणे अशक्य असून, कर्जासाठी दिलेल्या तारणाचे मुल्य वसुलीक्षम नाही, तसेच वैधानिक लेखापरीक्षक किंवा संस्थेने स्वत:हून कोणतेही थकीत अथवा अनियमित (आऊट ऑफ ऑर्डर) कालावधी विचारात न घेता ज्या खात्याचे वर्गीकरण बुडित कर्ज खाते (Loss Asset) म्हणून केले असेल असे कर्ज किंवा जिंदगी / मालमत्ता यावर किमान १०० टक्के तरतूद करावी.

अनुत्पादक जिंदगी / मालमत्ता (एन.पी.ए.) निश्चित करणेचा कालावधी, कर्जावरील व्याज व मुद्दल हप्ता थकीत अथवा अनियमित (आऊट ऑफ ऑर्डर) कर्ज खाते दिनांकापासून सहा महिने असेल अशा वेळी अनुत्पादक जिंदगी / मालमत्ता (एन.पी.ए.) वर्गीकरण खालीलप्रमाणे राहील. मात्र ज्या ज्या वेळी हा कालावधी तत्कालीन परिस्थितीनुसार बदलविण्यात येईल त्या त्या वेळी सर्व अनुत्पादक जिंदगी / मालमत्ता (एन.पी.ए.) वर्गीकरण त्या कालावधीनुसार कमी किंवा जास्त राहील.

परिशिष्ट-१
सन २०२४-२५ साठी एन.पी.ए. तरतूद वर्गीकरण

अ. क्र	वर्गवारी	थकबाकी किंवा अनियमित (आऊट ऑफ ऑर्डर) कालावधी	एन.पी.ए. किंवा अनुत्पादक कालावधी	करावयाची किमान तरतूद (खात्यावरील येणे रकमेवर)	
१	**उत्तम किंवा उत्पादित कर्ज** (Standard Asset)	१८० दिवस	---	०.२५%	
२	**दुय्यम कर्ज** (Sub Standard Asset)	१८० दिवसांपेक्षा जास्त व १८ महिन्यांपर्यंत	१२ महिन्यांपर्यंत	५%	
३	**संशयित कर्ज -** (Doubtful Asset)			तारणी	विनातारणी
	(अ) संशयित कर्ज -१ (Doubtful Asset-1)	१८ महिन्यापेक्षा जास्त ४२ महिन्यांपर्यंत	१२ महिन्यापेक्षा जास्त ३६ महिन्यांपर्यंत	१५%	६०%
	ब) संशयित कर्ज - २ (Doubtful Asset-2)	४२ महिन्यापेक्षा जास्त ५४ महिन्यांपर्यंत	३६ महिन्यापेक्षा जास्त ४८ महिन्यांपर्यंत	२०%	७०%
	क) संशयित कर्ज -३ (DoubtfulAsset -3)	५४ महिन्यापेक्षा जास्त	४८ महिन्यांपेक्षा जास्त	२५%	८०%
४	**बुडीत कर्ज -** (Loss Asset)	वैधानिक लेखापरिक्षकाने प्रमाणित केलेले किंवा संस्थेने स्वत:हून निर्धारीत केलेले कर्ज खाते किंवा जिंदगी / मालमत्ता		१००%	१००%

परिशिष्ट-२

सन २०२५-२६ साठी एन.पी.ए. तरतूद वर्गीकरण

अ. क्र	वर्गवारी	थकबाकी किंवा अनियमित (आऊट ऑफ ऑर्डर) कालावधी	एन.पी.ए. किंवा अनुत्पादक कालावधी	करावयाची किमान तरतूद (खात्यावरील येणे रकमेवर)	
१	उत्तम किंवा उत्पादित कर्ज (Standard Asset)	१८० दिवस	---	०.२५%	
२	दुय्यम कर्ज (Sub Standard Asset)	१८० दिवसांपेक्षा जास्त व १८ महिन्यांपर्यंत	१२ महिन्यांपर्यंत	६%	
३	संशयित कर्ज - (Doubtful Asset)			तारणी	विनातारणी
	(अ) संशयित कर्ज - १ (Doubtful Asset-1)	१८ महिन्यापेक्षा जास्त ४२ महिन्यांपर्यंत	१२ महिन्यापेक्षा जास्त ३६ महिन्यांपर्यंत	२०%	७०%
	ब) संशयित कर्ज - २ (Doubtful Asset -2)	४२ महिन्यापेक्षा जास्त ५४ महिन्यांपर्यंत	३६ महिन्यापेक्षा जास्त ४८ महिन्यांपर्यंत	२५%	८०%
	क) संशयित कर्ज -३ (DoubtfulAsset -3)	५४ महिन्यापेक्षा जास्त	४८ महिन्यापेक्षा जास्त	३०%	९०%
४	बुडीत कर्ज - (Loss Asset)	वैधानिक लेखापरिक्षकाने प्रमाणित केलेले किंवा संस्थेने स्वत:हून निर्धारीत केलेले कर्ज खाते किंवा जिंदगी / मालमत्ता		१००%	१००%

परिशिष्ट-३

सन २०२६-२७ साठी एन.पी.ए. तरतूद वर्गीकरण

अ. क्र	वर्गवारी	थकबाकी किंवा अनियमित (आऊट ऑफ ऑर्डर) कालावधी	एन.पी.ए. किंवा अनुत्पादक कालावधी	करावयाची किमान तरतूद (खात्यावरील येणे रकमेवर)	
१	उत्तम किंवा उत्पादित कर्ज (Standard Asset)	१८० दिवस	---	०.२५%	
२	दुय्यम कर्ज (Sub Standard Asset)	१८० दिवसांपेक्षा जास्त व १८ महिन्यांपर्यंत	१२ महिन्यांपर्यंत	८%	
३	संशयित कर्ज - (DoubtfulAsset)			तारणी	विनातारणी
	(अ) संशयित कर्ज - १ (Doubtful Asset-1)	१८ महिन्यापेक्षा जास्त ४२ महिन्यांपर्यंत	१२ महिन्यापेक्षा जास्त ३६ महिन्यांपर्यंत	२५%	८०%
	ब) संशयित कर्ज - २ (Doubtful Asset -2)	४२ महिन्यापेक्षा जास्त ५४ महिन्यांपर्यंत	३६ महिन्यापेक्षा जास्त ४८ महिन्यांपर्यंत	३०%	९०%
	क) संशयित कर्ज -३ (DoubtfulAsset -3)	५४ महिन्यापेक्षा जास्त	४८ महिन्यांपेक्षा जास्त	४०%	१००%
४	बुडीत कर्ज - (Loss Asset)	वैधानिक लेखापरिक्षकाने प्रमाणित केलेले किंवा संस्थेने स्वत:हून निर्धारीत केलेले कर्ज खाते किंवा जिंदगी / मालमत्ता		१००%	१००%

परिशिष्ट-४

सन २०२७-२८ साठी एन.पी.ए. तरतूद वर्गीकरण

अ. क्र	वर्गवारी	थकबाकी किंवा अनियमित (आऊट ऑफ ऑर्डर) कालावधी	एन.पी.ए. किंवा अनुत्पादक कालावधी	करावयाची किमान तरतूद (खात्यावरील येणे रकमेवर)	
१	**उत्तम किंवा उत्पादित कर्ज** (Standard Asset)	१८० दिवस	---	०.२५%	
२	**दुय्यम कर्ज** (Sub Standard Asset)	१८० दिवसांपेक्षा जास्त व १८ महिन्यांपर्यंत	१२ महिन्यांपर्यंत	१०%	
३	**संशयित कर्ज -** (DoubtfulAsset)			तारणी	विनातारणी
	(अ) संशयित कर्ज - १ (Doubtful Asset-1)	१८ महिन्यापेक्षा जास्त ४२ महिन्यांपर्यंत	१२ महिन्यापेक्षा जास्त ३६ महिन्यांपर्यंत	३०%	१००%
	ब) संशयित कर्ज - २ (Doubtful Asset -2)	४२ महिन्यापेक्षा जास्त ५४ महिन्यांपर्यंत	३६ महिन्यापेक्षा जास्त ४८ महिन्यांपर्यंत	४०%	१००%
	क) संशयित कर्ज -३ (Doubtful Asset -3)	५४ महिन्यापेक्षा जास्त	४८ महिन्यांपेक्षा जास्त	५०%	१००%
४	**बुडीत कर्ज -** (Loss Asset)	वैधानिक लेखापरिक्षकाने प्रमाणित केलेले किंवा संस्थेने स्वत:हून निर्धारीत केलेले कर्ज खाते किंवा जिंदगी / मालमत्ता		१००%	१००%

वरील जिंदगी/ मालमत्तेची वर्गवारी व त्यावरील तरतूदी यांच्या अनुषंगाने उदाहरणादाखल स्पष्टीकरण खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

दुय्यम कर्ज जिंदगी / मालमत्ता - (Sub Standard Asset)

दिनांक ३१/०३/२०२५ अखेर तरतूद खालीलप्रमाणे होईल.

१) कर्जदाराचे नांव	-	**अ**
कर्ज प्रकार	-	असुरक्षित / जामीनकी कर्ज
कर्ज रक्कम	-	रु. १,००,०००/-
कर्ज दिल्याची तारीख	-	दि.०१.०४.२०२४
कर्जाचा पहिला हप्ता सुरु	-	दि.०१.०५.२०२४
कर्जाचा थकबाकी दिनांक	-	दि.०१.०६.२०२४
दि.३१.०३.२०२५अखेर थकीत हप्ते	-	१० हप्ते
एन.पी.ए. वर्गवारी	-	दुय्यम कर्ज (Sub Standard)
करावी लागणारी तरतूद	-	५% प्रमाणे रु.५,०००/-

सर्व प्रथम या खात्यावरील दि.०१.०६.२०२४ पासून उत्पन्नात घेतलेले परंतु वसूल न झालेले व्याज व इतर खर्च रक्कम ज्या ज्या नफा तोटा खात्यामध्ये जमा केली असेल त्या त्या खाती नावे टाकावी. त्यानंतर शिल्लक मुद्दल रकमेवर विनातारणी कर्ज असले तरी किमान ५ टक्के प्रमाणे रु.५,०००/ तरतूद करावी.

२) कर्जदाराचे नांव	-	**ब**
कर्ज प्रकार	-	तारणी कर्ज
कर्ज रक्कम	-	रु.१,००,००० /-
कर्ज दिल्याची तारीख	-	दि.०१.०४.२०२४
कर्जाचा पहिला हप्ता सुरु	-	दि. ०१.०५.२०२४
कर्जाचा थकबाकी दिनांक	-	दि.०१.०६. २०२४
दि.३१.०३.२०२५अखेर थकीत हप्ते	-	१० हप्ते
एन.पी.ए. वर्गवारी	-	दुय्यम कर्ज (Sub Standard)
करावी लागणारी तरतूद	-	५% प्रमाणे रु.५,०००/-

सर्व प्रथम या खात्यावरील दि.०१.०६.२०२४ पासून उत्पन्नात घेतलेले परंतु वसूल न झालेले व्याज व इतर खर्च रक्कम ज्या ज्या नफा तोटा खात्यामध्ये जमा केली असेल त्या त्या खाती नावे टाकावी. त्यानंतर शिल्लक मुद्दल रकमेवर तारणी कर्ज असले तरी किमान ५ टक्के प्रमाणे रु.५,०००/- तरतूद करावी.

३) संशयित जिंदगी (१) - Doubtful Asset (1)

१) कर्जदाराचे नांव	-	**अ**
कर्ज प्रकार	-	असुरक्षित / जामीनकी कर्ज
कर्ज रक्कम	-	रु.१,००,००० /-
कर्ज दिल्याची तारीख	-	दि.०१.०४.२०२३
कर्जाचा पहिला हप्ता सुरु	-	दि. ०१.०५.२०२३
कर्जाचा थकबाकी दिनांक	-	दि.०१.०१.२०२४
दि.३१.०३.२०२५अखेर थकीत हप्ते	-	१५ हप्ते
एन.पी.ए. वर्गवारी	-	संशयित जिंदगी (१) - Doubtful Asset (1)
करावी लागणारी तरतूद	-	६०% प्रमाणे रु.६०,०००/-

सर्व प्रथम या खात्यावरील दि.०१.०१.२०२४ पासून उत्पन्नात घेतलेले परंतु वसूल न झालेले व्याज व इतर खर्च रक्कम ज्या ज्या नफा तोटा खात्यामध्ये जमा केली असेल त्या त्या खाती नावे टाकावी. त्यानंतर शिल्लक मुद्दल रकमेवर विनातारणी कर्ज असले तरी किमान ६० टक्के प्रमाणे रु. ६०,००० /- तरतूद करावी.

२) कर्जदाराचे नांव	-	**ब**
कर्ज प्रकार	-	तारणी कर्ज
कर्ज रक्कम	-	रु.१,००,०००/-
कर्ज दिल्याची तारीख	-	दि.०१.०४.२०२३
कर्जाचा पहिला हप्ता सुरु	-	दि.०१.०५.२०२३
कर्जाचा थकबाकी दिनांक	-	दि.०१.०१.२०२४
दि.३१.०३.२०२५ अखेर थकीत हप्ते	-	१५ हप्ते
एन.पी.ए. वर्गवारी	-	संशयित जिंदगी (१) - Doubtful Asset (1)
करावी लागणारी तरतूद	-	१५ टक्के प्रमाणे रु.१५,०००/-

सर्व प्रथम या खात्यावरील दि. ०१.०१.२०२४ पासून उत्पन्नात घेतलेले परंतु वसूल न झालेले व्याज व इतर खर्च रक्कम ज्या ज्या नफा तोटा खात्यामध्ये जमा केली असेल त्या त्या खाती नावे टाकावी. त्यानंतर शिल्लक मुद्दल रकमेवर तारणी कर्ज असले तरी किमान १५ टक्के प्रमाणे रु.१५,०००/- तरतूद करावी.

३) कर्जदाराचे नांव	-	**क**
कर्ज प्रकार	-	अर्ध तारणी कर्ज
कर्ज रक्कम	-	रु.१,००,०००/-
कर्ज दिल्याची तारीख	-	दि.०१.०४.२०२३
कर्जाचा पहिला हप्ता सुरु	-	दि.०१.०५.२०२३
कर्जाचा थकबाकी दिनांक	-	दि.०१.०१.२०२४
दि.३१.०३.२०२५अखेर थकीत हप्ते	-	१५ हप्ते
एन.पी.ए. वर्गवारी	-	संशयित जिंदगी (१) - Doubtful Asset (1)

सर्व प्रथम या खात्यावरील दि. ०१.०१.२०२४ पासून उत्पन्नात घेतलेले परंतु वसूल न झालेले व्याज व इतर खर्च रक्कम ज्या ज्या नफा तोटा खात्यामध्ये जमा केली असेल त्या त्या खाती नावे टाकावी. सदर कर्ज अर्ध तारणी असल्याने, तारण मूल्य रु.६०,०००/- असल्यास त्या रकमेवर १५ टक्के प्रमाणे रु.९,०००/- व उर्वरित रु.४०,०००/- विनातारणी रकमेवर ६० टक्के प्रमाणे रु.२४,०००/- अशी एकूण तरतूद रु.३३,०००/- करावी.

वरील प्रमाणे संशयित जिंदगी (२) - Doubtful Asset (2) व संशयित जिंदगी (३) - Doubtful Asset (3) या वर्गवारीतील तारणी व विनातारणी रक्कम विचारात घेऊन, वर दिलेल्या वर्षनिहाय परिशिष्टानुसार प्रतिवर्षी त्या त्या टक्केवारीनुसार अनुत्पादक खात्यांची तरतूद करावी. तसेच बुडीत कर्ज (Loss Asset) या वर्गवारीतील अनुत्पादक खात्यांची १०० टक्के तरतूद करावी.

<u>एन.पी.ए बाबत सूचना -</u>

१. प्रत्येक संस्थेने संचालक मंडळ सभेमध्ये गुंतवणूक, कर्ज वितरण, वसुली अथवा एन.पी.ए. व्यवस्थापनाबाबत सर्वसमावेशक धोरण निश्चित करणे आवश्यक आहे.

२. अनुत्पादक जिंदगी (एन.पी.ए) संकल्पना केवळ कर्ज या मालमत्तेपुरती मर्यादित नसून, गुंतवणुकीसह संस्थेच्या सर्वच जिंदगी व मालमत्तेसाठी लागू आहे.

३. उपविधी किंवा नियामक मंडळाचे मान्यतेनुसार पतसंस्थांना खेळते भांडवलासाठी केवळ कॅश क्रेडिट किंवा ओव्हरड्रॉफ्ट सारखी कर्जे देण्यास अनुमती आहे. अन्य कोणत्याही स्वरूपाची (उदा. बिल्स खरेदी अथवा चेक डिस्काउंट, इ.) कर्ज देण्यास मान्यता नाही.

४. **उत्पन्न निश्चितीचे धोरण - (Income recognition)**

(अ) उत्पन्न निश्चिततेच्या धोरणाचा मूळ उद्देश व पाया हा प्रत्यक्ष वसुलीनंतरच उत्पन्न ग्राहय धरणे हा होय. म्हणजेच व्याज येणे आहे मात्र प्रत्यक्ष व्याज वसुल झाले नसल्यास, असे व्याज उत्पन्न म्हणून नफातोटा पत्रकात दाखविता येणार नाही.

आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रत्यक्ष उत्पन्न प्राप्त झाल्यानंतरच सदरचे उत्पन्न हे उत्पन्न म्हणून दाखविले जाते. येणे उत्पन्न हे प्रत्यक्षात प्राप्त उत्पन्न म्हणून दाखविले जात नाही. त्यामुळे पतसंस्थांनी एन.पी.ए. खात्यावर व्याज व खर्च प्रत्यक्षात वसूल होत नाही तो पर्यंत कर्ज खाती प्राप्त व्याज अथवा येणे व्याज आकारून ते उत्पन्न म्हणून दाखवू नये.

(ब) कर्जाचे अनुत्पादक कर्जात वर्गीकरण करताना मुदत ठेवीवरील कर्ज तसेच एल.आय.सी., एन.एस.सी., इंदिरा विकास पत्रे, किसान विकास पत्रे, इत्यादी तसेच सोने तारण कर्जाचे अनुत्पादक कर्जात वर्गीकरण करू नये. मात्र खालील अपवादात्मक परिस्थितीत सदर खाती अनुत्पादक होतील.

१) एखादे खाते थकीत नसल्यास मात्र त्या दिवशीची तारण मुल्य रक्कम हि त्या दिवशीचे व्याजासह येणे रकमेपेक्षा कमी असल्यास ही कर्ज खाती अनुत्पादक होतील.

२) उपविधी अथवा नियामक मंडळ यांनी निर्धारित केलेला योग्य तो दुरावा राखला असल्यास परंतु थकीत कालावधी हा १२ महिन्यापेक्षा जास्त असेल तर अशी कर्ज खाती अनुत्पादक होतील.

वरील कारणामुळे अनुत्पादित झालेल्या कर्जाचे बाबतीत थकीत कालावधी वर्गीकरणानुसार वर दिलेल्या वर्षनिहाय परिशिष्टानुसार प्रतिवर्षी त्या त्या टक्केवारीनुसार अनुत्पादक तरतूद करावी लागेल. अशी कर्जे जो पर्यंत उत्पादित आहेत तो पर्यंतच अशा तारणावरील कर्जाचे येणे व्याज उत्पन्नात घेता येईल.

५. **एनपीए खात्यावर व्याज वसुल न झाल्यास काय करावे ?**

अ) कर्ज खात्यावर नावे टाकलेले व उत्पन्नात घेतलेले, परंतु वसुल न झालेले व्याज.

नफा तोटा (सदर उत्पन्न खाते) खाते (P&L) नावे व संबंधित कर्ज खाते जमा

ब) कर्जावरील येणे व्याज खाती नावे टाकलेले व उत्पन्नात घेतलेले, परंतु वसुल न झालेले व्याज.

नफा तोटा (सदर उत्पन्न खाते) नावे व कर्जावरील येणे व्याज खाते जमा

क) वरील (अ) व (ब) नुसार उत्पन्नात घेतलेले, परंतु वसुल न झाल्याने व्याज उत्पन्नातून कमी केल्यानंतर व्याजा संदर्भात खालीलप्रमाणे दुबेरजी नोंदी कराव्यात.

थकीत येणे व्याज खाते (Overdue Interest Receivable) (ताळेबंद जिंदगी बाजू) नावे

थकीत येणे तरतूद खाते (Overdue Interest Provision) (ताळेबंद देयता बाजू) जमा

ड) खाते अनुत्पादक झाल्यामुळे खात्यावर नावे न टाकलेले व्याज.

थकीत येणे व्याज खाते (Overdue Interest Receivable) (ताळेबंद जिंदगी बाजू) नावे

थकीत येणे व्याज तरतूद खाते (Overdue Interest Provision)) (ताळेबंद देयता बाजू) जमा

वरीलप्रमाणे तरतूदी केल्यानंतर खाते निहाय थकीत येणे व्याज व थकीत येणे तरतूद रक्कम जुळणे आवश्यक आहे. यामध्ये फरक असल्यास आणि थकीत येणे व्याज (Overdue Interest Receivable) (ताळेबंद जिंदगी बाजू) ही रक्कम जादा असल्यास फरक रकमेची स्वतंत्रपणे एन.पी.ए. तरतूद करावी.

थकीत येणे व्याज खात्यावर दाखविलेली रक्कम दुबेरजी असल्याने स्वनिधीमध्ये सदरचा समावेश होणार नाही. सदर रक्कम ताळेबंदात अनुक्रमे इतर येणी व इतर देणी या शिर्षकांतर्गत दर्शवावी. खेळते भांडवल निर्धारणाचे वेळी अन्य दुबेरजी नोंदीप्रमाणे सदर रक्कम वजा करावी.

६. **एनपीए खात्यावरील वसुली खर्च, विमा खर्च वसुल न झाल्यास काय करावे ?**

अ) कर्ज खात्यावर नावे टाकलेला व उत्पन्नात घेतलेला, परंतु वसुल न झालेला वसुली खर्च, विमा खर्च.

नफा तोटा (सदर उत्पन्न खाते) नावे व संबंधित कर्ज खाते जमा

ब) वसुली खर्च, विमा येणे खर्च खाती नावे टाकलेला व उत्पन्नात घेतलेला, परंतु वसुल न झालेला वसुली खर्च, विमा खर्च.

नफा तोटा (सदर उत्पन्न खाते) नावे व वसुली खर्च, विमा येणे खर्च खाते जमा

क) वरील (अ) व (ब) नुसार उत्पन्नात घेतलेले, परंतु वसुल न झाल्याने वसुली खर्च, विमा खर्च उत्पन्नातून कमी केल्यानंतर खालीलप्रमाणे दुबेरजी नोंदी कराव्यात.

थकीत वसुली खर्च येणे खाते (Overdue Recovery Receivable) (ताळेबंद जिंदगी बाजू) नावे
थकीत वसुली खर्च तरतूद खाते (Overdue Recovery Provision) (ताळेबंद देयता बाजू) जमा

ड) खाते अनुत्पादक झाल्यामुळे खात्यावर नावे न टाकलेला वसुली खर्च, विमा खर्च

थकीत वसुली खर्च येणे खाते (Overdue Recovery Receivable) (ताळेबंद जिंदगी बाजू) नावे
थकीत वसुली खर्च तरतूद खाते (Overdue Recovery Provision) (ताळेबंद देयता बाजू) जमा

वरीलप्रमाणे तरतूदी केल्यानंतर खातेनिहाय थकीत वसुली खर्च येणे व थकीत वसुली खर्च तरतूद रक्कम जुळणे आवश्यक आहे. यामध्ये फरक असल्यास आणि थकीत वसुली खर्च येणे (Overdue Recovery Receivable) (ताळेबंद जिंदगी बाजू) ही रक्कम जादा असल्यास फरक रकमेची स्वतंत्रपणे एन.पी.ए. तरतूद करावी.

थकीत वसुली खर्च खात्यावर दर्शविलेली रक्कम दुबेरजी असल्याने स्वनिधीमध्ये सदरचा समावेश होणार नाही. सदर रक्कम ताळेबंदात अनुक्रमे इतर येणी व इतर देणी या शिर्षकांतर्गत दर्शवावी. खेळते भांडवल निर्धारणाचे वेळी अन्य दुबेरजी नोंदीप्रमाणे सदर रक्कम वजा करावी.

ख) अनुत्पादक खात्यावर वसुली खर्च, वसुल झाल्यानंतर करावयाच्या हिशोब नोंदी -

- सर्व प्रथम त्या दिवसाअखेर प्रत्यक्षात झालेला वसुली खर्च जमा करण्यात यावा.
  अ) संबंधित कर्जखाते-----नावे व नफा तोटा (उत्पन्न) खाते-------जमा
- वसुली खर्चा नंतर उर्वरित रक्कमे मधून थकीत व अद्ययावत व्याज वसूल करण्यात यावे.
  ब) संबंधित कर्जखाते------नावे व नफा तोटा (उत्पन्न) खाते--------जमा
- वसूल रकमेचा वरीलप्रमाणे जमा खर्च केल्यानंतर (थकीत व अद्ययावत व्याज वसुली नंतर) उर्वरित रक्कमेमधून मुद्दल रक्कम वसूल होईल.
  क) रोख / बँक खाते (संपूर्ण वसुली रक्कम) --------- नावे
  संबंधित कर्ज खाते (संपूर्ण वसुली रक्कम) ---------जमा
- अनुत्पादक खात्यावर वसुली झाल्यावर प्रत्यक्षात थकीत व्याजाची जी रक्कम वसुल होईल, तेवढ्याच रकमेच्या खालीलप्रमाणे थकीत येणे दुबेरजी व्याजाच्या नोंदी उलटवून घ्याव्यात.
  थकीत येणे व्याज खाते (Overdue Interest Receivable) (ताळेबंद जिंदगी बाजू) जमा
  थकीत येणे तरतूद खाते (Overdue Interest Provision) (ताळेबंद देयता बाजू) नावे

पतसंस्थांनी उत्पादित व अनुत्पादित कर्जावरील वरीलप्रमाणे व्याज व वसुली खर्च विचारात घेऊन नियमितपणे नोंदी कराव्यात.

ग) पूर्वीचे अनुत्पादक अथवा एन.पी.ए. कर्ज खात्याचे बाबतीत कर्जदाराने जर दि.३१ मार्च रोजी नियमित बाबींची पूर्तता करून संपूर्ण थकबाकी रक्कम भरल्यास ते खाते दिनांक ३१ मार्च रोजी एन.पी.ए. मानण्याची आवश्यकता नाही.

घ) अनुत्पादक जिंदगी (एन.पी.ए.) ठरवणेसाठीचा थकीत अथवा अनियमित (आऊट ऑफ ऑर्डर) सवलत कालावधी (१८० दिवस किंवा वेळोवेळी बदलेला असेल तो) फक्त त्या त्या आर्थिक वर्षात नव्याने होणाऱ्या एन.पी.ए. खात्यासाठीच लागू राहील. यापूर्वी एन.पी.ए. असणाऱ्या खात्यासाठी ही सवलत लागू राहणार नाही.

ङ) अनुत्पादक खात्यावर होणाऱ्या वसुली रकमेचे व्याज व मुद्दल विनियोग प्रमाण निश्चित करतेवेळी त्या बाबतीत अनुत्पादक वर्गवारीनिहाय त्या त्या वर्गवारीतील सर्वच कर्ज खात्यासाठी एकसारखे विनियोग प्रमाण असणे आवश्यक असून, त्यामध्ये कोणताही भेदभाव करु नये. संस्थेच्या वसुली धोरणात व्याज व मुद्दल विनियोग प्रमाण किती राहील याचा समावेश करण्यात यावा. संस्थेच्या दरवर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत प्रत्येक वर्षाचे कर्ज, गुंतवणूक व अन्य धोरणांप्रमाणेच वसुली धोरण देखील निश्चित करणे आवश्यक आहे. संबंधित वैधानिक लेखापरीक्षकांनी त्यांचे लेखापरीक्षण अहवालात याबाबत संस्थेने वार्षिक सर्वसाधारण सभा पूर्व मंजुर वसुली धोरणानुसार नियमितता पाळली किंवा कसे याबाबत स्वतंत्र अभिप्राय नोंदवावेत. सदर धोरणाचे उल्लंघन झाले असल्यास, याबाबत उदाहरणनिहाय आक्षेप नोंदविणे आवश्यक आहे.

च) एक व्यक्ती विविध कर्ज -

एखाद्या कर्जखात्याचे एन.पी.ए. म्हणून वर्गीकरण करताना एकाच व्यक्तीला किंवा त्या व्यक्तीशी संबंधित उपविधीतील नातेवाईक व्याख्येनुसार नातेवाईकांना तसेच **एकाच समान तारणावर वेगवेगळ्या व्यक्तींना** त्या संस्थेच्या एक किंवा अनेक शाखांमधुन कर्जे दिली असल्यास व त्यापैकी कोणतेही एक कर्ज एन.पी.ए. झाले असल्यास त्या व्यक्तीच्या वरीलप्रमाणे संबंधित सर्व शाखांतील कर्ज व्यवहारास एन.पी.ए. समजून त्या सर्व कर्जप्रकारातील सर्वात खालच्या पातळीवरील वर्गीकरणाच्या आधारावर इतर सर्व खात्यांचे वर्गीकरण करून त्या वर्गीकरणातील टक्केवारीनुसार सर्वच खात्यांचे बाबतीत आवश्यक ती तरतूद करावी. म्हणजेच कर्जदाराचे एक खाते एनपीए झाल्यास इतर कर्ज खाती उत्पादित असली तरीही ती खाती एन.पी.ए. खात्या अंतर्गत येतील.

मुदत ठेवीवरील कर्ज, एल.आय.सी., एनएससी, इंदिरा विकास / किसान विकास पत्रे इत्यादी तसेच सोने तारण कर्जाबाबतीत अनुत्पादक कर्ज वर्गीकरण सवलत असली तरीही एखादया व्यक्तीचे या कर्जाशिवाय अन्य कर्ज एन.पी.ए. झाल्यास त्याची ही सवलतीची कर्जे जरी उत्पादित असली तरी सदर कर्जेही अनुत्पादक होऊन त्यावर सर्वात खालच्या पातळीवरील वर्गीकरणाच्या आधारावर तरतूद करावी.

छ) सहभाग कर्ज - (Consortium Finance)

एकाच कर्जदाराला जेव्हा अनेक पतसंस्था, बँका अथवा वित्तीय संस्था एकत्र येऊन कर्ज देतात, तेव्हा त्या कर्जाच्या परतफेडीबाबत प्रत्येक संस्थेचा अनुभव वेगळा असू शकतो. त्यामुळे प्रत्येक संस्थेने त्यांच्या कर्जाचे स्वतंत्रपणे कर्ज वसुलीचे वस्तुस्थितीच्या आधारावर अनुत्पादक व उत्पादक असे वर्गीकरण करावयाचे आहे.

ज) तारणाची वसुली योग्य किंमत खालीलप्रमाणे ठरवावी.

अ) स्थावर मालमता -

अनुत्पादक कर्जाचे बाबतीत साधारणतः प्रत्येक तीन वर्षांनी कर्जास रीतसर मॉरगेज करून तारण घेतलेल्या तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ व नियम १०७ अंतर्गत कारवाई करुन कर्जदार व जामीनदार यांची जप्त केलेली परंतु मिळकतीवर संस्थेचे इतर हक्क सदरी नाव लागले असेल अशा सर्व स्थावर मालमता विचारात घेऊन संस्थेचे नामतालीकेतील मुल्यांकनकार (पॅनल व्हॅल्युअर) यांचेकडून मुल्यांकन करून तसे प्रमाणपत्र घेणेत यावे.

रु.१०० लाख वा त्यावरील मुल्यांकन असणाऱ्या सर्व स्थावर मालमत्तांचे, संस्थेचे नामतालीकेतील दोन मुल्यांकनकार यांचेकडून प्रत्येक तीन वर्षांनी मुल्यांकन करुन, तसे प्रमाणपत्र घेणेत यावे. या मुल्यांकन अहवालासमवेत संस्था शाखा व्यवस्थापक / अधिकारी / कर्मचारी यांचा किमान एक वर्षापूर्वीचा तारण तपासणी व मालमत्ता अस्तित्वात असून सुस्थितीत असल्याबाबतचा तपासणी अहवाल दप्तरी असावा. तारणाच्या पूर्ण किंमतीचा विमा कवच असलेली अद्ययावत विमा पॉलिसी संस्था दप्तरी असावी. **ज्या वर्षी सदरची पूर्तता संस्थेने केली नसेल, त्या त्या वर्षासाठी संबधित कर्जाचे तारण मुल्य निरंक किंवा शून्य समजणेत येईल.**

ब) यंत्रसामुग्री / फर्निचर, फिक्चर इ. (Plant & Machinery)-

प्रतिवर्षी १०% घसारा वजावट विचारात घेऊन यंत्रसामुग्री / फर्निचर, फिक्चर इ. उत्तम स्थितीत असल्याबाबत तसेच कालबाहय नसल्याची खात्री केल्याबाबतचा उल्लेख असणारा नामतालीकेतील मुल्यांकनकार यांचेकडून प्रत्येक तीन वर्षांनी यंत्रसामुग्री / फर्निचर, फिक्चर इ. चे मुल्यांकन करून तसा दाखला दप्तरी असावा.'

रु.५० लाख वा त्यावरील मुल्यांकन असणाऱ्या सर्व यंत्रसामुग्री / फर्निचर, फिक्चर इ. चे संस्थेचे नामतालीकेतील दोन मुल्यांकनकार यांचेकडून प्रत्येक तीन वर्षांनी मुल्यांकन करून तसा दाखला संस्था दप्तरी ठेवण्यात यावा. सोबत संस्था शाखा व्यवस्थापक /अधिकारी/कर्मचारी यांचा किमान एक वर्षापूर्वीचा तारण तपासणी व मालमत्ता अस्तित्वात असून, सुस्थितीत असल्याबाबतीत तपासणी अहवाल संस्था दप्तरी असावा. तारणाच्या पूर्ण किंमतीचा विमा कवच असलेली अद्ययावत विमा पॉलिसी संस्था दप्तरी असावी. **ज्या वर्षी सदरची पूर्तता संस्थेने केली नसेल, त्या त्या वर्षासाठी संबधित कर्जाचे तारण मुल्य निरंक किंवा शून्य समजणेत येईल.**

क) तारण (पेडअप) मालसाठा -

तारण (पेड अप) मालसाठा म्हणजे मालसाठा वजा व्यापारी देणी होय. तारण (पेड अप) मालसाठा पत्रक हे नियमितपणे प्रती महिना संस्थेकडे येणे आवश्यक असून, अगदी अलीकडील किमान एक महिनापूर्वीचे तारण (पेड अप) मालसाठा पत्रक दप्तरी असणे आवश्यक आहे.

तारण (पेड अप) मालसाठ्यातील किंमत ही खरेदी किंमतीवर आधारित असणे आवश्यक असून, रु.१० लाख व त्यापेक्षा कमी कर्ज मर्यादा असणाऱ्या कर्जाचे बाबतीत वरिष्ठ अथवा कनिष्ठ लेखनिक तर रु.१० लाखापेक्षा जास्त मर्यादेसाठी शाखा व्यवस्थापक/ अधिकारी यांचा किमान अलीकडील सहा महिन्यापूर्वीचा तारण तपासणी व तारण माल अस्तित्वात असून, सुस्थितीत असल्याबाबतचा तपासणी अहवाल संस्था दप्तरी असावा. तारणाच्या पूर्ण किंमतीचा विमा कवच असलेली अद्ययावत विमा पॉलिसी संस्था दप्तरी असावी.

रु.२५ लाख व त्यापेक्षा जास्त कर्ज मर्यादेसाठी शाखा व्यवस्थापक / अधिकारी यांचे शिवाय संस्थेचे अंतर्गत लेखापरीक्षक (सनदी लेखापाल किंवा अंतर्गत लेखापरिक्षक, सनदी लेखापाल नसल्यास वैधानिक लेखापरीक्षक) यांचेकडून वर्षातून किमान एकदा मालसाठा तपासणी करून तसा अहवाल संस्था दप्तरी ठेवावा. **ज्या वर्षी सदरची पूर्तता संस्थेने केली नसेल, त्या त्या वर्षासाठी संबधित कर्जाचे तारण मुल्य निरंक किंवा शून्य समजणेत येईल.**

कर्ज खात्या व्यतिरिक्त अनुत्पादित मालमत्तेत समाविष्ट होणाऱ्या इतर बाबी -

अ) बचत, चालू किंवा अन्य ठेवी प्रमाणेच देयता बाजूस असणाऱ्या कोणत्याही शिर्षकांतर्गत खाते जुळवणीमध्ये फरक असून, त्यामध्ये कोणतीही नावे बाकी असल्यास निर्धारित वर्गीकरण कालावधीचा विचार न करता त्या नावे बाकीची १०० टक्के तरतूद करावी.

ब) रोख रक्कमेमध्ये पुस्तकी शिलकीपेक्षा जेवढी रक्कम कमी आढळल्यास, तसेच फाटक्या, तेलकट किंवा चलन बाह्य नोटा असल्यास त्याची १०० टक्के तरतूद करावी.

क) सर्व बँकामधील चालू अथवा बचत ठेव खात्यांचे दरमहाचे ताळमेळ (रिकन्सीलेशन) पत्रक तयार करताना त्यामध्ये बँकेला येणे असलेल्या निर्धारित कालावधी (१८० दिवसापेक्षा) पेक्षा जादा कालावधीच्या प्रलंबित नोंदींच्या रकमांची १०० टक्के तरतूद करावी.

ड) सर्व बँकामधील मुदत ठेव स्वरुपात असणाऱ्या गुंतवणूकीवरील व्याज अथवा मुद्दल देय दिनांकापासून निर्धारित थकीत कालावधीपेक्षा अधिक कालावधीपेक्षा थकीत असल्यास या गुंतवणुकीवरील व्याज हे उत्पन्नात घेता येणार नसल्याने वसूल न झालेले सर्व व्याज उत्पनातून काढून टाकावे लागेल. तसेच मुद्दल रकमेची प्रती वर्ष समान हप्त्यामध्ये पुढील १० वर्षे सलग तरतूद करावी. सदरची नोंद खालीलप्रमाणे होईल.

नफा तोटा (सदर उत्पन्न खाते) ---- नावे
संबंधित मुदत ठेव / गुंतवणुकीवरील येणे व्याज खाते ---- जमा

एखाद्या अडचणीतील बँकेबाबत रिझर्व्ह बँकेच्या पूर्व मान्यतेनुसार त्या बँकेचे अन्य बँकेत विलिनीकरण झाले असल्यास किंवा पी.एम.सी बँकेप्रमाणे पुनर्रचना केली असल्यास, विलिनीकरण झालेल्या बँकेतील मुदत ठेव स्वरुपातील गुंतवणूकीचे विलिनीकरण करुन घेतलेल्या बँकेच्या कर्जरोखे व भागभांडवलामध्ये रुपांतरण केल्यास अशा गुंतवणूकीबाबत रुपांतरीत झालेल्या कर्जरोख्यावर कराराप्रमाणे नियमितपणे जोपर्यंत व्याज (उत्पन्न) मिळत आहे तोपर्यंत सदर गुंतवणूक अनुत्पादित गुंतवणूक राहणार नाही. तसेच भाग भांडवलावरती नियमितपणे जोपर्यंत लाभांश मिळत आहे तोपर्यंत ती गुंतवणूक उत्पादित राहील. अशी गुंतवणूक अनुत्पादित झाल्यास वसूल न झालेले सर्व व्याज उत्पनातून वजा करावे व मुद्दल रकमेची प्रती वर्ष समान हप्त्यामध्ये पुढील १० वर्षे सलग तरतूद करावी.

इ) उपविधी/नियामक मंडळ मान्यतेनुसार कोणत्याही सहकारी संस्थेत राज्य सहकारी बँक किंवा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक किंवा अन्य कोणत्याही सहकारी संस्थेत (जिल्हा, विभागीय, राज्य फेडेरेशन, गृहनिर्माण संस्था इ.) भाग भांडवल स्वरूपात गुंतवणूक केली असल्यास व अशा गुंतवणुकीवर लाभांश देय असेल तर सलगचे आर्थिक वर्षाचा लाभांश नजीकचे पुढील आर्थिक वर्षात प्रत्यक्षात जमा न झाल्यास त्या गुंतवणुकीवर प्रती वर्ष समान हप्त्यामध्ये पुढील १० वर्षे सलग तरतूद करावी. मात्र उपविधी/नियामक मंडळ मान्यता नसताना कोणत्याही सहकारी अथवा अन्य संस्थेत भाग भांडवल स्वरूपात गुंतवणूक केली असली तरी अशा गुंतवणुकीवर लाभांश मिळत असला अथवा नसला तरी या गुंतवणुकीवर १०० टक्के तरतूद करावी.

ई) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम १९६१, उपविधी, नियामक मंडळ मान्यता नसलेली व प्रतिबंधित असणारी गुंतवणूक उत्पादित तसेच अनुत्पादित असली तरी त्या गुंतवणुकीवर १०० टक्के तरतूद करावी. (उदा. अन्य कोणत्याही पतसंस्थेतील सर्व प्रकारची गुंतवणूक, म्युच्युअल फंड, साखर कारखाना, सुत गिरणी, अन्य ट्रस्ट इत्यादी मधील गुंतवणुक)

मान्यता प्राप्त बँकांमधील एक किंवा दोन दिवसासाठी केली जाणारी लिक्विड फंड गुंतवणूक उत्पादित असल्यास सदर बाबत तरतूदीची आवश्यकता नाही.

उ) सरकारी कर्जरोख्यातील गुंतवणूक असेल आणि संस्थेने त्याबाबतीत गुंतवणूक धोरण मान्य केले असल्यास त्यानुसार जर एच. टी. एम. (Held to Maturity - मुदत संपेपर्यंत राखून ठेवलेली) वर्गवारीतील रोख्यांसाठी प्रत्येक रोखेनिहाय दर्शनी किमतीपेक्षा खरेदी मुल्य जास्त असेल म्हणजेच दर्शनी किंमतीपेक्षा जादा किंमत (प्रिमियम) देऊन खरेदी केली असल्यास अशी जादा अदा केलेली रक्कम (प्रिमियम) मुदत संपणेचा शिल्लक कालावधी विचारात घेऊन रकमेची प्रती वर्षी नफा तोटा खाते नावे टाकून कर्जरोख्याची पुस्तकी किंमत कमी करावी.

उदा.

एखादा रोखा रु.१००/- या दर्शनी किंमतीपेक्षा रु.१०५/- या किंमतीला खरेदी केला असल्यास व अशा रोख्याची खरेदीच्या वेळी शिल्लक मुदत (मुळ मुदत नव्हे) ५ वर्षे असल्यास, वरील जादा रु.५/- प्रिमियमची रक्कम प्रती वर्षी रु.१/- प्रमाणे नफा तोटा खाती अमोरटायझेशन (झीज) या शीर्षकाखाली नावे टाकून सदर रोख्याची पुस्तकी किंमत कमी करावी.

मान्यता प्राप्त गुंतवणूक धोरणानुसार एच. टी. एम. (Held to Maturity - मुदत संपेपर्यंत राखून ठेवलेली) वर्गवारी व्यतिरिक्त कर्ज रोख्याची गुंतवणूक अन्य वर्गवारीत असल्यास अशा वर्गवारीसाठी पुस्तकी किंमत व बाजारमुल्य विचारात घेऊन प्रती वर्ष अखेर पुस्तकी किंमतीपेक्षा बाजारमुल्य कमी असल्यास तेवढया रकमेची घसारा तरतूद करावी.

संस्थेचे मान्यता प्राप्त गुंतवणूक धोरण नसल्यास संस्थेला एच. टी. एम. (Held to Maturity - मुदत संपेपर्यंत राखून ठेवलेली) वर्गवारीची सवलत घेता येणार नाही. अशा परिस्थितीत संस्थेच्या सर्व गुंतवणूकीबाबत पुस्तकी किंमत व बाजारमुल्य विचारात घेऊन प्रती वर्ष अखेर पुस्तकी किंमतीपेक्षा बाजारमुल्य कमी असल्यास तेवढया रकमेची घसारा तरतूद करावी.

ऊ) इमारत बांधकाम अथवा फर्निचर कामासाठी दिलेला अग्रिम (अॅडव्हान्स) रक्कम संबंधित वास्तुविशारद यांनी सदर कामकाजाच्या पुर्णत्वाच्या कालावधीबाबत प्रमाणित केलेल्या तारखेनंतर सदर रक्कम प्रलंबित राहिल्यास, तसेच या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणास्तव अग्रिम अथवा अॅडव्हान्स स्वरुपात रक्कम दिली असल्यास व दिलेली रक्कम ३ महिन्यानंतर जमा न झाल्यास, अशा रकमांवर निर्धारीत कालावधी संपल्यानंतर तात्काळ १०० टक्के तरतूद करावी.

कर्मचाऱ्यांना सेवा नियम व वेतन करारातील तरतूदीनुसार सण / उत्सव अग्रिम दिला असल्यास व त्याचा देय कालावधी संपल्यानंतर तात्काळ शिल्लक रकमेवर १०० % तरतूद करावी.

ए) संस्थेची जेवढी रक्कम अफरातफरीमध्ये अडकलेली असेल त्या रकमेवर तातडीने १००% तरतूद करावी.

ऐ) या कार्यालयाचे कोव्हीड - १९ कर्ज हप्तेवाढ योजना परिपत्रक दि.२४.०९.२०२० व दि.१६.१०.२०२० नुसार केलेल्या सूचनानुसार अनुत्पादक तरतूद होत असल्याची वैधानिक लेखापरीक्षक यांनी खात्री करावी. अन्यथा त्या बाबतीत दिलेल्या निर्देशानुसार आवश्यक ते शेरे वैधानिक लेखापरीक्षण अहवालामध्ये नमूद करावे.

ओ) उपदान (ग्रॅज्युईटी) व रजा रोखीकरण या बाबतीत भारतीय हिशोब मानका (अकौन्टीग स्टैंडर्ड) नुसार तरतूद करणे आवश्यक आहे. तसेच भविष्य निर्वाह निधीबाबत आवश्यक ती रक्कम भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे जमा केली नसल्यास अशा अपुऱ्या भरणा केलेल्या रकमेबाबतही तरतूद करावी अन्यथा याबाबतीत आवश्यक ते शेरे वैधानिक लेखापरीक्षकाने त्यांच्या लेखापरीक्षण अहवालामध्ये नमूद करावे.

झ) अनुत्पादक जिंदगीबाबत (एन.पी.ए.) अहवाल सादर करणे -

(अ) प्रत्येक वर्षी बिगर कृषी सहकारी पतसंस्थांनी दिनांक ३१ मार्च अखेरचे एनपीए बाबत लेखापरीक्षण दिनांक ३१ जुलै पूर्वी पूर्ण झाल्यावर एक महिन्याचे आत मात्र उशिरात उशिरा दिनांक ३१ ऑगस्ट पर्यंत संबंधित निबंधक यांचेकडे सदरचा अहवाल सादर करणे बंधनकारक आहे. संस्थेच्या वार्षिक अहवालात अनुत्पादित मालमत्तेचा अहवाल (एन.पी.ए. स्टेटमेंट) पुढील नमुन्यात प्रसिद्ध करणे संस्थेला बंधनकारक राहील.

अ.क्र.	तपशिल	रक्कम (लाखात)
१.	एकूण कर्ज (Gross advance)	
२.	अनुत्पादित कर्ज (Gross (NPA)	
३.	अनुत्पादित कर्जाचे एकूण कर्जाशी शेकडा प्रमाण (२ भागिले १ गुणिले १००)	%
४.	**वजा - (Deductions)** अ) थकीत व्याज तरतूद (Overdue Interest Reserve) नफा तोटा खाते किंवा निव्वळ नफा वितरणातून निर्माण केलेली थकीत व्याज तरतूद (थकीत व्याज दुबेरजी नोंद समाविष्ट नाही) ब) एकरकमी परतफेड योजना किंवा वसुली पोटी अनामत खात्याला जमा असलेल्या रकमा	
	एकूण वजा (Deductions)**(अ + ब)**	
५.	एकूण संशयित बुडित कर्ज तरतूद (NPA / BDDR Provision)	
६.	निव्वळ कर्ज (Net Advance) (१ वजा ५)	
७.	निव्वळ अनुत्पादित कर्ज (Net NPA) (२ वजा ४ वजा ५)	
८.	निव्वळ अनुत्पादित कर्जाचे निव्वळ कर्जाशी शेकडा प्रमाण (७ भागिले ६ गुणिले १००)	%

(स्वाक्षरी-)
व्यवस्थापक/ सर व्यवस्थापक
------- पतसंस्था

(स्वाक्षरी-)
अंतर्गत लेखापरीक्षक

(स्वाक्षरी-)
वैधानिक लेखापरीक्षक

सनदी लेखापाल (सीए), अंतर्गत लेखापरीक्षक किंवा वैधानिक लेखापरिक्षक म्हणुन काम करीत असतील त्यांनी लेखापरीक्षणाचे वेळी आवश्यक दस्तऐवज प्रमाणित करण्यासाठी युनिक डॉक्युमेंट आयडेंटिफिकेशन नंबर (UDIN) (१८ अंकी) दर्शविणे आवश्यक आहे. अशा प्रत्येक दस्तऐवजासाठी युनिक नंबर नमूद करणे आवश्यक राहील.

वैधानिक लेखापरीक्षकाने प्रमाणित केल्याप्रमाणे ढोबळ अनुत्पादित मालमत्ता (ग्रॉस एनपीए) आदर्श कमाल प्रमाण १०% व निव्वळ अनुत्पादित मालमत्ता (नेट एनपीए) यांचे आदर्श कमाल प्रमाण ५% राहील.

महत्त्वाच्या सूचना :-

१) कर्जखाते एन.पी.ए. झाल्यानंतर व्याज आकारणी करुन सदर व्याजाची रक्कम उत्पन्नात घेऊ नये. सदर खात्यावरील व्याज आकारणी स्वतंत्रपणे बाजूला करण्यात यावी. तसेच सदर खात्यावर प्रत्यक्ष वसुल झाल्याशिवाय कोणताही खर्च नावे टाकण्यात येऊ नये.

२) कर्जखाते एन.पी.ए. झाल्यावर उत्पन्नात घेतलेले थकीत व्याज उलटवून घेण्यात यावे.

३) प्रत्येक पतसंस्थेने कोणतीही जिंदगी/मालमत्ता अनुत्पादित ठरवणेकरीता प्राथमिक स्तरावरील उत्पन्नाची ओळख ही वसुलीच्या वस्तुनिष्ठ नोंदींवर केली पाहिजे. तसेच ज्या कालावधीसाठी जिंदगी/मालमत्ता अकार्यक्षम राहिल, अशा जिंदगी/ मालमत्तेबाबत वसुलीपोटी उपलब्ध तारणमुल्य विचारात घेऊन अनुत्पादित जिंदगी/मालमतेच्या वर्गीकरणानुसार आवश्यक तरतूद केली पाहिजे. कोणत्याही प्रकारची कर्ज जिंदगी/मालमत्ता अनुत्पादित होऊ नये यासाठी कर्ज मंजुर व वितरीत करतानाच कर्जदाराच्या वास्तववादी उत्पन्न स्त्रोताचा प्राधान्याने विचार करणे आवश्यक आहे. संस्थेच्या अनुत्पादक मालमत्तेबाबत प्रकरणनिहाय रक्कम वसुलीचे वेळापत्रक निश्चित करुन, त्यानुसार वसुलीबाबत प्रत्यक्ष कार्यवाही करणे आवश्यक आहे.

४) नियामक मंडळाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार संस्थेने अनुत्पादित मालमत्ता वर्गीकरण तसेच मालमत्ता वर्गीकरण बदल (डाउनग्रेडिंग आणि अपग्रेडिंग) हे स्वयंचलित संगणकीय कार्यप्रणाली (सिस्टम बेस) मधूनच करणे आवश्यक आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारचा मानवी हस्तक्षेप असता कामा नये.

५) प्रत्येक संस्थेने प्रत्येक आर्थिक वर्षाच्या शेवटी अनुत्पादित मालमत्तेची पुरेशी तरतुद केली पाहिजे. जेणेकरुन कोणत्याही आर्थिक वर्षासाठी नफातोटा खाते आणि ताळेबंद पत्रकामध्ये अनुत्पादित मालमत्तेसाठी केलेली तरतूद अचूकपणे प्रतिबिंबित होईल. आवश्यक परिस्थितीत वेळप्रसंगी तोटा सहन करुनही संबंधीत आर्थिक वर्षात पतसंस्थांनी उत्पादित कर्ज, अनुत्पादित जिंदगी/ मालमत्तेच्या वर्गीकरणानुसार पुरेशी तरतूद करणे आवश्यक आहे. एखाद्या अनुत्पादित जिंदगी/ मालमत्तेबाबत संस्थेला अधिक तरतूद करणे गरजेचे वाटल्यास त्या बाबतीत जादा तरतुद करण्यास पतसंस्थांना कोणत्याही प्रकारचा प्रतिबंध नाही.

६) संस्थेने केलेले जिंदगी/ मालमत्तेचे वर्गीकरण व तरतूद आणि वैधानिक लेखापरीक्षणामध्ये वैधानिक लेखापरीक्षकांनी केलेले जिंदगी/ मालमत्तेचे वर्गीकरण व तरतुदीमध्ये १० टक्के वा त्यापेक्षा अधिक प्रमाणात तफावत दिसुन आल्यास, अशा प्रकरणी संबंधित वैधानिक लेखापरीक्षकांनी स्वतंत्ररित्या सदरबाबतची कारणमिमांसा उदाहरणासह लेखापरीक्षण अहवालात गंभीर आक्षेपांतर्गत भाग-अ मध्ये नोंदविण्यात यावी.

७) स्वयंचलित संगणकीय कार्यप्रणाली (सिस्टम बेस) द्वारे मालमत्ता वर्गीकरण अचूक होण्यासाठी संस्थेने व्यापक सायबर सुरक्षा फ्रेमवर्क तयार करणे आवश्यक आहे. तसेच स्वयंचलित संगणकीय कार्यप्रणालीचे (सिस्टम बेस) या क्षेत्रातील पात्रता धारक सनदी लेखापाल यांचेकडूनच किमान दोन वर्षातून एकदा सिस्टिम ऑडीट करुन घेणे आवश्यक आहे.

८) संस्थेने कर्जाच्या परतफेडीच्या अचूक तारखा, परतफेडीची वारंवारता, मुदत कर्ज व्याजदर, अधिस्थगन कालावधी दिला असल्यास सदरचा कालावधी, मुद्दल आणि व्याज परतफेडीचा सुरवातीचा दिनांक इत्यादी सर्व महत्वाचा तपशील कर्ज करारामध्ये स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक असून, त्याच्या योग्य नोंदी संगणकीय प्रणालीमध्ये नोंदविणे आवश्यक आहे. या सर्व बाबींची तपशीलवार माहिती कर्जदार, सहकर्जदार व जामीनदार यांना कर्ज वितरीत करणेपूर्वी संस्थेचे संबंधित कर्ज अधिकारी किंवा शाखा व्यवस्थापक यांनी देणे अनिवार्य आहे.

९) अनुत्पादित जिंदगी/ मालमत्ता वर्गीकरण अचूक पद्धतीने करणेसाठी सदर परिपत्रकातील सुचनांचे संस्थेतील सर्व संबंधित सेवकांनी काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. ज्या ठिकाणी वर्गीकरणासाठी जबाबदार असलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्याने कोणत्याही कारणास्तव संबंधित सुचनांचे जाणीवपूर्वक पालन केले नसल्याचे निदर्शनास आल्यास, त्या संबंधित अधिकारी/ कर्मचाऱ्यास सदर बाबीस जबाबदार धरून, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व संबंधित संस्थेचे सेवा नियमातील तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहतील. पतसंस्थांच्या संचालक मंडळाने देखील या संदर्भात सेवकांसाठी जबाबदारी व उत्तरदायित्व धोरण ठरवणे आवश्यक आहे. असे धोरण न ठरवल्यास किंवा धोरण ठरवूनही अशा बाबी निदर्शनास आल्यास, संबंधित संस्थेचे संचालक मंडळाने विहित मुदतीत याबाबतीत उचित कारवाई न केल्यास संचालक मंडळ देखील वैधानिक कारवाईस पात्र राहील. संबंधित वैधानिक लेखापरीक्षकानी याबाबत आपले अभिप्राय लेखापरीक्षण अहवालात नोंदविणे आवश्यक व बंधनकारक राहील.

१०) संस्थांच्या संचालक मंडळाने प्रत्येक मासिक सभेमध्ये संस्थेची कर्ज थकबाकी व एन पी ए कमी होणेचे दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना याबाबत चर्चा करणे आवश्यक आहे. सदर सभेमध्ये सदर उपाययोजने अंतर्गत किमान २० मोठ्या थकबाकीदार कर्जदारांचे बाबतीत सविस्तर चर्चा होऊन, संबंधीत कर्ज प्रकरणांबाबत प्रकरणनिहाय वसुलीचे बाबतीत आढावा घेऊन, उचित कारवाईबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे. सोबतच किमान २० मोठे उत्पादित कर्जदारांचे व २० मोठ्या थकबाकीदार कर्जदारांचे खात्या बाबतीत दरमहा संचालक मंडळ सभेत आढावा घेण्यात यावा.

११) सदर परिपत्रकातील सुचनांचा अर्थ लावताना कोणत्याही प्रकारच्या अडचणींचे निराकरण करणे किंवा अधिक स्पष्टीकरण निर्गमित करण्याचे अंतिम अधिकार महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळ, पुणे यांचे असतील.

१२) सदरच्या सूचना राज्यातील सर्व नागरी सहकारी पतसंस्था व बिगरशेती सहकारी पतसंस्था तसेच पगारदार पतसंस्था यांना सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षापासून लागू होतील. दि.३१/०३/२०२४ पर्यंत दि.१०/११/२००४ रोजीच्या व त्यापुढे निर्गमीत संबंधीत लागु असलेल्या परिपत्रकीय सुचना अंमलात राहतील.

उपरोक्त सर्व सुचनांचे काटेकोर पालन करुनच, राज्यातील नागरी व ग्रामीण बिगर शेती/पगारदार सहकारी पतसंस्थाना मान्य उत्पन्न संकल्पना, जिंदगीचे वर्गीकरण व तरतूदी (एन.पी.ए.) (Income recognition, Assets classification and provisions - Non Performing Assets) लागू करणेबाबत सर्व संबंधितांनी आवश्यक कार्यवाही करावी. सदर सुचनांचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित नागरी व ग्रामीण बिगर शेती /पगारदार सहकारी पतसंस्था महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था अधिनियम, १९६० व महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था नियम, १९६१ मधील संबंधित तरतुदीनुसार कारवाईस पात्र राहतील. सदर सुचनांनुसार कार्यवाही झाली किंवा नाही याबाबत संबंधित वैधानिक लेखापरीक्षकांनी आपल्या लेखापरिक्षण अहवालात उचित ठिकाणी अभिप्राय नोंदवावेत. तसेच वैधानिक लेखापरीक्षकांनी संस्थेने निर्धारीत केलेली एन.पी.ए. ची रक्कम, केलेली तरतुद व सदरचे शेकडा प्रमाण व लेखापरीक्षणाअंती असलेली एन.पी.ए. ची रक्कम, केलेली तरतुद व सदरचे शेकडा प्रमाण या बाबत आपले लेखापरीक्षण अहवालात स्पष्ट अभिप्राय नोंदविणे आवश्यक आहे. सदर नुसार कार्यवाही न करणारे संबंधित वैधानिक

लेखापरिक्षक हे उचित वैधानिक कारवाईस पात्र राहतील. सर्व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था व जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था यांनी सदरच्या सूचना आपले कार्यक्षेत्रातील सर्व नागरी व ग्रामीण बिगर शेती /पगारदार सहकारी पतसंस्था व सहकार विभागाच्या नामतालिकेवरील सर्व लेखापरीक्षकांच्या निर्देशनास आणुन देण्याची कार्यवाही करावी.

(अनिल कवडे)
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य बिगर कृषी नियामक मंडळ,
तथा सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति,

१) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व).
२) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (लेखापरीक्षण), (सर्व).
३) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व).
४) जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था, (सर्व).
५) तालूका/ वॉर्ड उपनिबंधक/ सहायक निबंधक, सहकारी संस्था, (सर्व)
६) दि इन्स्टीटयुट ऑफ चार्टर्ड अकौंटंटस ऑफ इंडिया, WIRC, बि.के.सी., बांद्रा, मुंबई-४०००५१.
७) दि इन्स्टीटयुट ऑफ कॉस्ट ॲन्डवर्क्स अकौंटंटस ऑफ इंडिया, जन्मभूमीमार्ग, फोर्ट, मुंबई.
८) अध्यक्ष/सचिव, ऑडीटर्स कौन्सिल ॲन्ड वेलफेअर असो., पुणे
(प्रमाणित लेखापरीक्षकांची राज्यस्तरीय संघटना)
९) अध्यक्ष/सचिव, महाराष्ट्र राज्य को-ऑप.ऑडीटर्स महासंघ, पुणे
(प्रमाणित लेखापरीक्षकांची राज्यस्तरीय संघटना)
१०) प्रमाणित लेखापरीक्षकांच्या जिल्हास्तरीय संघटना (सर्व),
११) अध्यक्ष /मुख्य कार्यकारी अधिकारी,............................ (सर्व पतसंस्था फेडरेशन)
(राज्य/ विभागीय / जिल्हा/ तालुका)
१२) अध्यक्ष /मुख्य कार्यकारी अधिकारी/ व्यवस्थापक /सचिव ,.......................... नागरी/ग्रामीण बिगर शेतकी /पगारदार सहकारी पतसंस्था मर्या. ....तालुका ....जिल्हा ....

प्रत, माहितीस्तव -

१) अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) अपर निबंधक (वसुली व नियोजन), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) अपर निबंधक (प्रशासन), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) अपर निबंधक (तपासणी व निवडणुका), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५) अपर निबंधक (लेखापरीक्षण), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६) कार्यासन अधिकारी, सहकार आयुक्तालय, पुणे (सर्व).
७) मा. सहकार आयुक्त यांचे खाजगी सचिव.
८) कार्यासन अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान शाखा, मुख्यालय,पुणे
(कार्यालय संकेतस्थळावर प्रसिध्दीस्तव)
९) निवड नस्ती.

प्रत -माहितीस्तव सविनय सादर,

मा.अपर मुख्य सचिव (सहकार व पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई-३२.